Epaper

दैनिक जन

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

सत्याचे प्राईम्स

सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

'संविधान आक्रोश तिरंगा रेल रोको' आंदोलन (पान २ वर)



। गुरुवार, दि. १७ सप्टेंबर २०२६ । वर्ष १ । अंक १५८ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

Selected

वारीतील अपघाती मृतांच्या वारसांना चार लाखांची मदत

मुंबई : आषाढी वारीसाठी श्री क्षेत्र पंढरपूर येथे जात असताना अपघाती निधन झालेल्या वारकऱ्याच्या कुटुंबाला राज्य सरकारकडून चार लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कै. संभाजी हरी पाटील या वारकऱ्याच्या वारसांना ही मदत देण्यात येणार आहे. वारकऱ्यांसाठी राज्य सरकारने 'विठ्ठल-रुक्मिणी वारकरी योजना २०२५' लागू केली होती. १६ जून ते १० जुलै २०२५ या कालावधीत वारीशी संबंधित असताना अपघाती निधन झालेल्या वारकऱ्यांच्या कुटुंबीयांना या योजनेअंतर्गत आर्थिक मदत देण्याची तरतूद करण्यात आली होती. शासनाने पाटील यांच्या वारसांना चार लाख रुपये मदत मंजूर केली आहे. संबंधित रक्कम वितरित करण्याची कार्यवाही कोल्हापूर जिल्हाधिकाऱ्यांनी करावी.

शिंदे गटाच्या वतीने नीरज किशन कौल यांचा युक्तिवाद, आज पुन्हा होणार सुनावणी

'चिन्हाचा विषय असेल तर राजकीय पक्ष महत्त्वाचा'

जन सम्राट टाईम्स

नवी दिल्ली / मुंबई । : सुप्रीम कोर्टात शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबतचं प्रकरण आता अत्यंत उत्कंठावर्धक वळणावर आलं आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचे वकील कपिल सिब्बल यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुख्यनेतापदाच्या निवडीवर आक्षेप घेतला होता. त्यांनी हे पद कायदेशीर नसल्याचा युक्तिवाद केला होता. त्यांचा हाच युक्तिवाद एकनाथ शिंदे यांचे वकील नीरज किशन कौल यांनी खोडून काढण्याचा प्रयत्न केला. एकनाथ शिंदे यांची मुख्यनेतापदी झालेली निवड कशी योग्य आहे?

शिवसेना पक्ष-चिन्हाच्या वादावर सुनावणी उत्कंठावर्धक वळणावर

याबाबत कौल यांनी युक्तिवाद केला. विशेष म्हणजे निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्ह देताना कोणत्या गोष्टींचा विचार केला आणि त्या देत असताना कुठली पद्धत योग्य ठरली, याबाबत कौल यांनी विश्लेषण केलं. एकीकडे कौल यांच्याकडून वारंवार विधीमंडळ पक्षाच्या संख्येबाबतच्या युक्तिवादावर जोर धरला जात असताना सुप्रीम कोर्टाने राजकीय पक्ष पाहून चिन्ह दिलं जातं, अशी महत्त्वाची टिप्पणी केली. यामुळे हे प्रकरण प्रचंड उत्कंठावर्धक वळणावर आल्याचं बघायला मिळत आहे. नीरज किशन कौल यांना आज युक्तिवाद करण्यासाठी केवळ अर्धा तासांचा वेळ मिळाला. आपण उद्या पुन्हा युक्तिवाद करु, असं



नीरज किशन कौल यांनी कोर्टात सांगितलं. सध्याचा वाद हा एकनाथ शिंदे यांच्या नियुक्तीचा नाही. कोणता मूळ पक्ष हा सध्या मुद्दा आहे. शिंदे यांनी आमदार आणि मंत्री म्हणून जे काम केलं ते लोकप्रतिनिधी म्हणून केलं. त्यावर आक्षेप घेण्याचा प्रश्नच नाही, असा युक्तिवाद नीरज किशन कौल यांनी केला. पक्षातील अंतर्गत लोकशाहीचा प्रश्न महत्त्वाचा आहे, असा युक्तिवाद नीरज किशन कौल यांनी केला. पक्षाला चांगल्या उत्तरदायित्वाची अपेक्षा आहे. उद्धव ठाकरेंच्या वेळी ही अपेक्षा पूर्ण झाली नसल्याचं दिसून येतं. ठाकरेंनी पक्षाला स्वत:च्या वैयक्तिक व्यवस्थेप्रमाणे वापरण्याचा प्रयत्न केला, असा युक्तिवाद कौल यांनी केला. तसेच कार्यकर्त्याला पक्षात काय सुरु आहे यावर बोलण्याचा अधिकार आहे. तसेच पक्ष संघटना कशी चालावी यावर बोलण्याचा अधिकार आहे, असा युक्तिवाद नीरज किशन कौल यांनी केला. केंद्रीय निवडणूक आयोगाने कोणत्या आधारावर एकनाथ शिंदेंना पक्षाचं नाव आणि चिन्ह बहाल केलं, याबाबत नीरज किशन यांनी युक्तिवाद केला. "पक्ष कुणाचा हे ठरवण्यासाठी तीन टेस्ट घेण्यात आल्या. यामध्ये पहिली टेस्ट पक्षाची घटना होती. दुसरी संघटना होती आणि तिसरी विधीमंडळ पक्ष होती. तिसरी टेस्ट महत्त्वाची आहे, कारण पूर्वीच्या दोन टेस्टमध्ये समस्या आहेत", असा युक्तिवाद कौल यांनी केला.यावेळी कौल यांनी 2018 ची पक्षाची घटना ही निवडणूक आयोगाला देण्यात आली नव्हती, असा युक्तिवाद केला.

न्यायिक आढावा घेण्यासाठी बसलोय: कोर्ट

तसेच पक्षाच्या संघटनेबाबत बोलायचं झालं तर पक्ष हा एकाधिकारशाहीत होता. त्यामुळे विधीमंडळ पक्षाची संख्या पाहून निर्णय घेण्यात आला, असा युक्तिवाद कौल यांनी केला. विधीमंडळ पक्ष ही महत्त्वाची चाचणी आहे, असं नीरज कौल म्हणाले. "संघटनेत दोन तृतीयांश पेक्षा जास्त लोक नियुक्त होत असतील तर पक्षात लोकशाही कुठे आहे? ही तर एकाधिकारशाही झाली ना?", असे सवाल कौल यांनी युक्तिवादात केले. यावर "आपण इथे न्यायिक आढावा घेण्यासाठी बसलोय", अशी महत्त्वाची टिपण्णी कोर्टाने यावेळी केली."निवडणूक आयोग ही एक महत्त्वाची संस्था आहे. निवडणूक आयोगाने पक्ष, चिन्ह देताना पडताळलेल्या बाबी योग्य आहेत. चिन्हाचा निर्णय देताना विधीमंडळ पक्षाची संख्या महत्त्वाची आहे.

एका मागणीबाबत कायदेशीर अडचण; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: 'मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांच्या तब्येतीची सरकारला काळजी आहे. त्यांनी केलेल्या १३ पैकी १२ मागण्या राज्य सरकारने मान्य केल्या आहेत. मात्र, एका मागणीबाबत कायदेशीर अडचण आहेत. राज्य सरकारने चर्चेचे दरवाजे खुले ठेवले आहेत. मात्र, गणेशोत्सवाच्या काळात उत्सावावर ताण येण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुंबईत येण्याचा निर्णय त्यांनी घेऊ नये,' असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे बुधवारी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी श्री कसबा गणपती, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती, साने गुरुजी तरुण मंडळ, श्री साई मित्रमंडळ ट्रस्ट या गणपतींचे दर्शन घेतले आणि आरती केली. महापौर मंजूषा नागपुरे आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांनी तेथेही गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, 'जरांगे यांच्या एका मागणीबाबत कायदेशीर अडचण असून, त्याची माहिती जरांगे यांना देण्यात आली आहे. मात्र, सरकारने चर्चेचे दरवाजे खुले ठवले आहेत. त्यांनी तब्येतीची काळजी घ्यावी. वैद्यकीय उपचार घ्यावेत. उपोषण नंतरही करता येईल. मुंबई आणि पुण्यात मोठ्या प्रमाणावर गणेशोत्सव साजरा होतो. या परिस्थितीत मुंबईत येऊन आंदोलन करण्याचा निर्णय जरांगे यांनी घेऊ नये. उत्सवावर ताण येईल, अशी कोणतीही भूमिका त्यांनी घेऊ नये. सरकार खुल्या मनाने सर्व गोष्टी मान्य करत आहे.''सुरुवातीला चांगला पाऊस पडल्यानंतर मोठा खंड पडला आहे. त्यामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. या संदर्भात मंत्रिमंडळाच्या बैठकीतही सविस्तर चर्चा झाली. राज्य शासनाने प्राथमिक सर्वेक्षण सुरू केले



आहे. राज्यातील शेतकऱ्यांना मदत केली जाईल,' असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या निवासस्थानी आले असता, मराठा आरक्षणाची मागणी करणाऱ्या आंदोलकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना घेराव घालण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी हस्तक्षेप करून गोंधळ घालणाऱ्या आंदोलकांना ताब्यात घेतल्याने परिस्थिती नियंत्रणात आली. आंदोलकांकडून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.श्री साई मित्रमंडळ ट्रस्टच्या परिसरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ढोल-ताशांच्या गजरात स्वागत झाले. या वेळी त्यांनी ढोल वाजविणाऱ्या युवकाकडून टिपरी काठी घेऊन स्वतः ढोल वाजविण्याचा आनंद घेतला. 'मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांच्या तब्येतीची सरकारला काळजी आहे. त्यांनी केलेल्या १३ पैकी १२ मागण्या राज्य सरकारने मान्य केल्या आहेत. मात्र, एका मागणीबाबत कायदेशीर अडचण आहेत. राज्य सरकारने चर्चेचे दरवाजे खुले ठेवले आहेत. मात्र, गणेशोत्सवाच्या काळात उत्सावावर ताण येण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुंबईत येण्याचा निर्णय त्यांनी घेऊ नये,' असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे बुधवारी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी श्री कसबा गणपती, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती, साने गुरुजी तरुण मंडळ, श्री साई मित्रमंडळ ट्रस्ट या गणपतींचे दर्शन घेतले आणि आरती केली. महापौर मंजूषा नागपुरे आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांनी तेथेही गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, 'जरांगे यांच्या एका मागणीबाबत कायदेशीर अडचण असून, त्याची माहिती जरांगे यांना देण्यात आली आहे. मात्र, सरकारने चर्चेचे दरवाजे खुले ठवले आहेत. त्यांनी तब्येतीची काळजी घ्यावी. वैद्यकीय उपचार घ्यावेत. उपोषण नंतरही करता येईल. मुंबई आणि पुण्यात मोठ्या प्रमाणावर गणेशोत्सव साजरा होतो. या परिस्थितीत मुंबईत येऊन आंदोलन करण्याचा निर्णय जरांगे यांनी घेऊ नये. उत्सवावर ताण येईल, अशी कोणतीही भूमिका त्यांनी घेऊ नये.

साळिंदराची शिकार बिबट्याच्या अंगलट

जन सम्राट टाईम्स

मुंबई |प्रतिनिधी: दबक्या पावलांनी शिकार करणाऱ्या बिबट्यालाच साळिंदराची शिकार जीवावर बेतल्याची खळबळजनक घटना तळबीड (ता. कराड) परिसरात उघडकीस आली आहे. साळिंदराच्या अंगावरील अतीव टोकदार आणि प्राणघातक काटे बिबट्याच्या शरीरात खोलवर घुसल्याने गंभीर दुखापत होऊन त्याचा मृत्यू झाला असल्याची प्राथमिक शक्यता वन विभागाने व्यक्त केली आहे.या घटनेमुळे तळबीड परिसरात बिबट्या पाठोपाठ आता साळिंदर प्राण्याचेही भय तीव्रतेने दाटले आहे. तळबीड परिसरातील शेतात बिबट्या मृतावस्थेत पडल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरताच स्थानिकांमध्ये घबराट पसरली. ही माहिती मिळताच वनाधिकारी ललिता पाटील यांच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. बिबट्याची शिकार किंवा मानवी हस्तक्षेप झाला आहे का, याचा शोध घेतला असता बिबट्याचे सर्व अवयव सुस्थितीत आणि सुरक्षित असल्याचे निदर्शनास आले. प्राथमिक अंदाजानुसार, बिबट्याने साळिंदराची शिकार करण्याचा प्रयत्न केला असावा. स्वतःचा बचाव करण्यासाठी साळिंदराने अंगावरील काटे उभे करून प्रतिकार केला. या धुमश्चक्रीत साळिंदराचे काटे बिबट्याच्या तोंडात, मानगुटीवर आणि शरीरात खोलवर रुतले. साळिंदराच्या काट्यांमधील विषारी संसर्ग आणि तीव्र वेदनांमुळे बिबट्याला हालचाल करणे असह्य झाले असावे. अन्नपाण्याविना तडफडून त्याचा सुमारे दोन दिवसांपूर्वी मृत्यू झाला असावा असा संशय आहे. या घटनेने परिसरातील शेतकरी चक्रावून गेले आहेत. बिबट्यासारख्या आक्रमक शिकारी प्राण्याला थारा न देणारा साळिंदर किती धोकादायक ठरू शकतो, याची जाणीव झाल्याने ग्रामस्थांमध्ये नव्या भीतीचे वातावरण आहे. वन विभागाचे पथक परिसरात इतर वन्यप्राण्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवून असून पुढील तपास करत आहे. तळबीड परिसरातील नागरिक आजवर केवळ बिबट्याच्या वावरामुळे भयभीत होते. मात्र, एका साळिंदराने स्वतःच्या संरक्षणासाठी बिबट्यासारख्या हिंस्र प्राण्याचा थेट बळी घेतल्याची घटना उघडकीस आल्याने आता साळिंदराची नवी दहशत निर्माण झाली आहे.

मराठा : न्या. शिंदे समितीला स्वतंत्र जागा; दरमहा चार लाखांचे मानधन रद्द

जन सम्राट टाईम्स

मुंबई : । प्रतिनिधी: मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे मुंबईकडे येत असताना आरक्षणाच्या अनुषंगाने प्रमाणपत्रांच्या कार्यपद्धतीसंदर्भात काम करणाऱ्या माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) समितीच्या कामकाजाला राज्य सरकारने प्रशासकीय स्वरूप दिले आहे. समितीच्या कामकाजासाठी मंत्रालयात स्वतंत्र जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. समितीच्या बैठकीनुसार मानधनाची तरतूद करण्यात आली आहे. मात्र बुधवारी जाहीर करण्यात आलेल्या शुद्धीपत्रकाद्वारे समितीच्या अध्यक्षांना दरमहा देण्यात येणारे चार लाख रुपये निश्चित मानधन देण्याची तरतूद वगळण्यात आली. सामान्य प्रशासन विभागाने बुधवारी तीन स्वतंत्र शासन निर्णय जारी केले. पहिल्या निर्णयानुसार नवीन प्रशासन भवनाच्या १२ व्या मजल्यावरील ऊर्जा विभागाला पूर्वी देण्यात आलेली जागा आता न्या. शिंदे समिती आणि मराठा आरक्षण कक्षाला देण्यात आली आहे. समिती व कक्षाचे कामकाज संपल्यानंतर ही जागा पुन्हा ऊर्जा विभागाकडे देण्यात येणार आहे. दुसऱ्या शासन निर्णयात समितीच्या बैठकींसाठी मानधनाची पद्धत स्पष्ट करण्यात आली आहे. प्रत्येक जिल्ह्यात प्रत्यक्ष अथवा दूरचित्र माध्यमातून घेण्यात येणाऱ्या बैठकीसाठी ५० हजार



रुपये, विभागीय आयुक्त स्तरावरील बैठकीसाठी दोन लाख रुपये मानधन निश्चित करण्यात आले आहे. अशा बैठकींचे एकत्रित मासिक मानधन चार लाख रुपयांच्या मर्यादेत राहणार असल्याचे या निर्णयात नमूद करण्यात आले आहे. या तरतुदीनंतर लगेचच जारी करण्यात आलेल्या शुद्धीपत्रकामुळे मानधनाच्या स्वरूपात महत्त्वाचा बदल झाला आहे. २५ जूनच्या शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक चारमध्ये न्या. संदीप शिंदे यांना समितीच्या कामकाजासाठी दरमहा चार लाख रुपये मानधन अनुज्ञेय राहील, अशी तरतूद होती. १६ सप्टेंबरच्या शुद्धीपत्रकाने ही तरतूद थेट वगळण्यात आली आहे. त्यामुळे निश्चित मासिक चार लाख रुपयांच्या मानधनाऐवजी बैठकींच्या स्वरूपानुसार देयकाची व्यवस्था लागू राहणार आहे. मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे मुंबईकडे येत असताना आरक्षणाच्या अनुषंगाने प्रमाणपत्रांच्या कार्यपद्धतीसंदर्भात काम करणाऱ्या माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) समितीच्या कामकाजाला राज्य सरकारने प्रशासकीय स्वरूप दिले आहे. समितीच्या कामकाजासाठी मंत्रालयात स्वतंत्र जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे.आलेल्या शुद्धीपत्रकाद्वारे समितीच्या अध्यक्षांना दरमहा देण्यात येणारे चार लाख रुपये निश्चित मानधन देण्याची तरतूद वगळण्यात आली.

मुंबईच्या दिशेने आज पुढचे पाऊल; मनोज जरांगे पाटोदा येथून रवाना होणार

अशक्तपणामुळे एक दिवस मुक्काम वाढवला; सरकारकडून मनधरणीचे प्रयत्न सुरू

जन सम्राट टाईम्स

बीड | प्रतिनिधी: मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईच्या दिशेने निघालेले मनोज जरांगे पाटील यांनी अशक्तपणामुळे बुधवारी पाटोदा येथे मुक्काम वाढवला. मात्र, मुंबईकडे जाण्याच्या भूमिकेवर ते ठाम असून, गुरुवारी दुपारी एकच्या सुमारास मुंबईसाठी रवाना होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, राज्य सरकारकडून जरांगे पाटील यांची मनधरणी करण्याचे प्रयत्न सुरू असून, विविध मंत्र्यांकडून आंदोलन स्थगित करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. जरांगे पाटील यांची प्रकृती खालावल्याची माहिती मिळाल्यानंतर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंके यांनी वैद्यकीय पथकासह पाटोदा येथे जाऊन त्यांची तपासणी केली. त्यांचा रक्तदाब कमी असल्याचे तसेच शरीरातील पाण्याची पातळी घटल्याचे डॉक्टरांनी सांगितले. उपचार घेण्याची विनंती जरांगे पाटील यांनी मान्य केली. प्रवास टाळून रुग्णालयात दाखल होऊन उपचार घेण्याचा सल्ला देण्यात आल्याचेही सोळंके यांनी सांगितले. 'उद्या दुपारी एक वाजता मुंबईकडे निघणार' बुधवारी सायंकाळी पत्रकार परिषदेत जरांगे पाटील यांनी आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. नारायणगडाचे ह. भ. प. शिवाजी महाराज यांनी विनंती केल्यानंतर त्यांचा मान ठेवून सलाईन घेतल्याचे त्यांनी सांगितले. 'आजऐवजी उद्या दुपारी



एकच्या सुमारास मुंबईच्या नियोजित दौऱ्यावर निघणार आहे,' असे जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले. सरकारने काही मागण्या मान्य केल्या असल्या तरी काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर ठोस निर्णय आणि कालबद्ध अंमलबजावणीची हमी मिळेपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचे त्यांनी सांगितले. हैदराबाद जीआरमध्ये सुधारणा करण्याची मागणी जरांगे पाटील यांनी हैदराबाद गॅझेटसंदर्भातील जीआरमध्ये सुधारणा, ५८ लाख नोंदींना धक्का लागणार नाही याची हमी आणि कुणबी प्रमाणपत्रासाठी व्हॅलिडिटीची अडचण निर्माण होणार नाही, याबाबत सरकारकडून स्पष्टता देण्याची मागणी केली. तसेच सातारा आणि कोल्हापूर गॅझेटच्या अंमलबजावणीची कालमर्यादा सरकारने स्पष्ट करावी, अशी मागणीही त्यांनी केली. मुख्यमंत्री याबाबत कालबद्ध अंमलबजावणीचा शब्द देतील, तर आंदोलनाबाबत पुनर्विचार केला जाऊ शकतो; अन्यथा मुंबईतील आंदोलनाच्या भूमिकेवर आपण ठाम असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, राज्य सरकारकडून नवीन मसुदा आल्याची माहिती मिळत असल्याचे जरांगे पाटील यांनी सांगितले. 'सरकारचा मसुदा पाहून त्याबाबत भूमिका मांडू,' असे त्यांनी स्पष्ट केले. आंदोलकांना गावाकडे परतण्याचे आवाहन पाटोदा येथे थांबलेल्या मराठा आंदोलकांनी आपापल्या गावाकडे परतावे, असे आवाहनही जरांगे पाटील यांनी केले. मुंबईकडे जाण्यापासून अडविण्याचा प्रयत्न झाल्यास आंदोलकांना पुन्हा बोलावून घेऊ, असेही त्यांनी सांगितले. गणेशोत्सवात गैरसोय टाळण्याचे मुख्यमंत्र्यांचे आवाहन दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी मनोज जरांगे पाटील यांना आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आवाहन केले. मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भात सरकारने १३ पैकी १२ मागण्या मान्य केल्या असून, उर्वरित एका मागणीबाबत कायदेशीर अडचण असल्याने तत्काळ निर्णय घेणे शक्य नसल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले. गणेशोत्सवाच्या काळात मुंबई, पुण्यासह राज्यातील नागरिकांची गैरसोय होईल किंवा कायदा-सुव्यवस्थेवर ताण निर्माण होईल, अशी कोणतीही भूमिका घेऊ नये, असे आवाहन फडणवीस यांनी केले आहे.

गंगापूर व रत्नपूर तालुक्यातील शिक्षकांच्या वेतनवाढीचा प्रश्न!

जन सम्राट टाईम्स

सोयगाव शहर | प्रतिनिधी: गंगापूर व रत्नपूर तालुक्यातील शिक्षकांची वेतनवाढ बंद करण्याच्या निर्णयाच्या निषेधार्थ सोयगाव तालुक्यातील शिक्षकांनी काळ्या फिती लावून निषेध व्यक्त केला. शिक्षकांच्या वेतनवाढीबाबत घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे संबंधित शिक्षकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. शिक्षकांच्या म्हणण्यानुसार, या निर्णयामुळे त्यांच्या आर्थिक हितावर परिणाम होत असून, निर्णयाचा फेरविचार करून वेतनवाढ पूर्ववत करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. निषेध आंदोलनात सोयगाव तालुक्यातील शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत काळ्या फिती लावून शासनाच्या निर्णयाचा निषेध केला. शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांचा सकारात्मक विचार करून संबंधित शिक्षकांना त्यांची वेतनवाढ पूर्ववत मिळावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. "शिक्षकांची वेतनवाढ बंद करण्याचा निर्णय अन्यायकारक असून, शासनाने तातडीने या निर्णयाचा फेरविचार करून संबंधित शिक्षकांना न्याय द्यावा," अशी भूमिका शिक्षकांनी मांडली. या निषेध आंदोलनातून शिक्षकांची एकजूट दिसून आली. मागणी मान्य न झाल्यास आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही शिक्षकांच्या वतीने देण्यात आला.गंगापूर व रत्नपूर तालुक्यातील शिक्षकांची वेतनवाढ बंद करण्याच्या निर्णयाच्या निषेधार्थ सोयगाव तालुक्यातील शिक्षकांनी काळ्या फिती लावून निषेध व्यक्त केला. शिक्षकांच्या वेतनवाढीबाबत घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे संबंधित शिक्षकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.या निर्णयामुळे त्यांच्या आर्थिक हितावर परिणाम होत असून, निर्णयाचा फेरविचार करून वेतनवाढ पूर्ववत करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. निषेध आंदोलनात सोयगाव तालुक्यातील शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत काळ्या फिती लावून शासनाच्या निर्णयाचा निषेध केला.

कृषी मूल्यसाखळ्यांमध्ये गुंतवणूक होण्याची गरज

पणन मंत्री जयकुमार रावल यांचे प्रतिपादन

जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी : महाराष्ट्राची कृषी उत्पादन क्षमता भक्कम आहे. आता कृषी क्षेत्राच्या पुढील टप्प्यातील विकासासाठी पायाभूत सुविधा, गुणवत्ता व्यवस्था, मूल्यवर्धन आणि बाजारपेठेशी जोडलेल्या मूल्य साखळ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पणन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी केले. मुंबईत आयोजित 'मॅग्नेट ॲग्री बिझनेस इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टर मीट'च्या समारोपाच्या सत्रात ते बोलत होते. या वेळी आमदार चरणसिंग ठाकूर, पणन सचिव प्रवीण दराडे, पणन संचालक तथा महाराष्ट्र कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे व गुंतवणूकदार उपस्थित होते. केळी, आंबा आणि लिंबूवर्गीय पिकाच्या क्षेत्रात शेतकरी पातळीवरील एकत्रीकरण व्यवस्था, प्राथमिक टप्प्यातील पायाभूत सुविधा, गुणवत्ता व्यवस्थापन आणि थेट बाजारपेठेशी जोडणी मजबूत करण्याची गरज आहे. 'हब-अँड-स्पोक' मॉडेलला विशेष महत्व देण्यात आले. या मॉडेलमध्ये 'स्पोक' स्वरूपाच्या सुविधा शेतकरी पातळीवरील कृषी मालाचे एकत्रीकरण आणि प्राथमिक हाताळणी मजबूत करतील, तर 'हब'च्या माध्यमातून आधुनिक प्रक्रिया, शीतसाठवणूक, मूल्यवर्धन आणि निर्यातीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध होतील, असे मंत्री रावल म्हणाले. या मेळाव्याला गुंतवणूकदार, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी, निर्यातदार, शेतकरी उत्पादक कंपन्या, प्रक्रिया उद्योग, किरकोळ विक्रेते तसेच वित्तीय संस्थांचा चांगला प्रतिसाद मिळाल्याचे रावल यांनी सांगितले.मॅग्नेट २.० अंतर्गत सहा प्राधान्य समूह आणि आगामी 'ईओआय' प्रक्रियेत मेळाव्यातून मिळालेल्या सूचनांचा उपयोग करण्यात येणार असून, विकसित



होणाऱ्या संधी व्यावसायिकदृष्ट्या व्यवहार्य, उद्योग क्षेत्राच्या गरजांशी सुसंगत आणि बाजारपेठेच्या मागणीशी जोडलेल्या राहतील, यावर भर दिला जाणार आहे. बाजारपेठेसाठी केवळ उत्पादन करण्याऐवजी बाजारपेठेच्या गरजेनुसार मूल्यसाखळी उभारली पाहिजे. केवळ कृषी मालाची निर्यात न करता गुणवत्तेची हमी असलेली आणि बाजारपेठेसाठी तयार उत्पादने निर्माण करण्यावर भर दिला पाहिजे. शासन, उद्योग, गुंतवणूकदार आणि शेतकरी यांनी भागीदार म्हणून एकत्रितपणे सक्षम कृषी-व्यवसाय परिसंस्था उभारली पाहिजे, असे मंत्री रावल यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्राची कृषी उत्पादन क्षमता भक्कम आहे. आता कृषी क्षेत्राच्या पुढील टप्प्यातील विकासासाठी पायाभूत सुविधा, गुणवत्ता व्यवस्था, मूल्यवर्धन आणि बाजारपेठेशी जोडलेल्या मूल्य साखळ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पणन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी केले. मुंबईत आयोजित 'मॅग्नेट ॲग्री बिझनेस इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टर मीट'च्या समारोपाच्या सत्रात ते बोलत होते. या वेळी आमदार चरणसिंग ठाकूर, पणन सचिव प्रवीण दराडे, पणन संचालक तथा महाराष्ट्र कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे व गुंतवणूकदार उपस्थित होते. केळी, आंबा आणि लिंबूवर्गीय पिकाच्या क्षेत्रात शेतकरी पातळीवरील एकत्रीकरण व्यवस्था, प्राथमिक टप्प्यातील पायाभूत सुविधा, गुणवत्ता व्यवस्थापन आणि थेट बाजारपेठेशी जोडणी मजबूत करण्याची गरज आहे. 'हब-अँड-स्पोक' मॉडेलला विशेष महत्व देण्यात आले. या मॉडेलमध्ये 'स्पोक' स्वरूपाच्या सुविधा शेतकरी पातळीवरील कृषी मालाचे एकत्रीकरण आणि प्राथमिक हाताळणी मजबूत करतील, तर 'हब'च्या माध्यमातून आधुनिक प्रक्रिया, शीतसाठवणूक, मूल्यवर्धन आणि निर्यातीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध होतील, असे मंत्री रावल म्हणाले. या मेळाव्याला गुंतवणूकदार, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी, निर्यातदार, शेतकरी उत्पादक कंपन्या, प्रक्रिया उद्योग, किरकोळ विक्रेते तसेच वित्तीय संस्थांचा चांगला प्रतिसाद मिळाल्याचे रावल यांनी सांगितले.मॅग्नेट २.० अंतर्गत सहा प्राधान्य समूह आणि आगामी 'ईओआय' प्रक्रियेत मेळाव्यातून मिळालेल्या सूचनांचा उपयोग करण्यात येणार असून, विकसित होणाऱ्या संधी व्यावसायिकदृष्ट्या व्यवहार्य, उद्योग क्षेत्राच्या गरजांशी सुसंगत आणि बाजारपेठेच्या मागणीशी जोडलेल्या राहतील, यावर भर दिला जाणार आहे. बाजारपेठेसाठी केवळ उत्पादन करण्याऐवजी बाजारपेठेच्या गरजेनुसार मूल्यसाखळी उभारली पाहिजे. केवळ कृषी मालाची निर्यात न करता गुणवत्तेची हमी असलेली आणि बाजारपेठेसाठी तयार उत्पादने निर्माण करण्यावर भर दिला पाहिजे. शासन, उद्योग, गुंतवणूकदार आणि शेतकरी यांनी भागीदार म्हणून एकत्रितपणे सक्षम कृषी-व्यवसाय परिसंस्था उभारली पाहिजे.

जळगावात ४ ऑक्टोबरला 'संविधान आक्रोश तिरंगा रेल रोको' आंदोलन

जन सम्राट टाईम्स



जळगाव। प्रतिनिधी: 'उपवर्गीकरण नको', 'ईव्हीएम नको' आणि 'दादर चैत्यभूमीचे नामांतर करा', या तीन मागण्यांसाठी संविधानवादी व आंबेडकरवादी संघटनांच्या वतीने जळगाव येथे ४ ऑक्टोबर २०२६ रोजी 'संविधान आक्रोश तिरंगा रेल रोको आंदोलन' आयोजित करण्यात आले आहे. दुपारी २ वाजता हे आंदोलन होणार असून, आंदोलनस्थळ म्हणून जळगाव रेल्वे स्टेशन परिसरातील संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ एकत्रित होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या आंदोलनाच्या नियोजनासाठी जिल्हास्तरावर विविध संघटनांच्या बैठका घेण्यात येणार आहेत. त्याच पार्श्वभूमीवर २१ सप्टेंबर २०२६ रोजी जळगाव येथील महेंद्र हॉटेल येथे दुपारी २ वाजता पत्रकार परिषद तसेच जिल्हास्तरीय बैठक आयोजित करण्यात आली आहे. त्यानंतर भुसावळ येथील संविधान भवन, भीमालय केंद्रीय कार्यालय येथे सायंकाळी ६ वाजता जिल्हाव्यापी पत्रकार परिषद व बैठक होणार आहे. ऑल इंडिया संविधान आर्मीचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष जगन भाई सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली ही बैठक होणार असून, विविध १० संघटनांचे पदाधिकारी, संविधानवादी व आंबेडकरवादी कार्यकर्ते तसेच अनुसूचित जाती प्रवर्गातील ५९ जातींचे प्रतिनिधी या बैठकीस उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली. आंदोलनाच्या पुढील नियोजनावर तसेच तीन मागण्यांसंदर्भात बैठकीत चर्चा करण्यात येणार आहे. संविधानवादी संघटना, आंबेडकरवादी व आरक्षणवादी कार्यकर्ते आणि संबंधित समाजातील प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

जन सम्राट टाईम्स बेक न्यूज

भगवान झुलेलाल यांच्या रूपातील बाप्पा ठरतोय आकर्षण!



जन सम्राट टाईम्स

धुळे | प्रतिनिधी : साक्री रोड येथील कुमार नगर परिसरातील जय झुलेलाल मित्र मंडळाच्या लाडक्या गणरायाचे मुखदर्शन मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पै. रावसाहेब गिरासे आणि भाजपा नगरसेवक धीरज परदेशी यांच्या हस्ते उत्साहात खुले करण्यात आले. भगवान झुलेलाल यांच्या रूपातील आकर्षक गणेशमूर्ती, विद्युत रोषणाई आणि भक्तांचा उत्साह यामुळे मंडळाचा गणेशोत्सव यंदा विशेष आकर्षण ठरत आहे. गणरायाच्या आगमनापासूनच मंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

मुखदर्शनाचा सोहळा सुरू होताच गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने गर्दी केली. गणरायाच्या गाण्यांवर मान्यवरांसह मंडळाच्या कार्यकर्त्यांनी ठेका धरत जल्लोष केला. *'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'*च्या जयघोषाने साक्री रोड परिसर दुमदुमून गेला. यावेळी पै. रावसाहेब गिरासे यांनी गणेशभक्तांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा देत जय झुलेलाल मित्र मंडळाच्या सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे कौतुक केले. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी गणरायाचे विधिवत पूजन करून स्थापना केली. १९ वर्षांची गणेशोत्सवाची परंपरा जय झुलेलाल मित्र मंडळाकडून गेल्या १९ वर्षांपासून कुमार नगर, साक्री रोड परिसरात गणरायाची स्थापना केली जात आहे. दरवर्षी विविध सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करून मंडळाने गणेशोत्सवाची परंपरा जपली आहे. यंदाही भगवान झुलेलाल यांच्या रूपातील गणेशमूर्ती साकारण्यात आली असून, ती गणेशभक्तांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे. गणरायाचे मुखदर्शन गणेशभक्तांसाठी खुले झाल्यानंतर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई आणि भक्तांचा उत्साह यामुळे गणेशोत्सवाला विशेष रंगत आली आहे.

याप्रसंगी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पै. रावसाहेब गिरासे, भाजपा नगरसेवक धीरज परदेशी, जय झुलेलाल मित्र मंडळाचे रिकी गलानी, हितेश रोहिरा, कमल लुंड, हनीष गलानी, वरुण लूल्ला, अनुप डीयालानी यांच्यासह मंडळाचे कार्यकर्ते व गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. साक्री रोड येथील कुमार नगर परिसरातील जय झुलेलाल मित्र मंडळाच्या लाडक्या गणरायाचे मुखदर्शन मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पै. रावसाहेब गिरासे आणि भाजपा नगरसेवक धीरज परदेशी यांच्या हस्ते उत्साहात खुले करण्यात आले. भगवान झुलेलाल यांच्या रूपातील आकर्षक गणेशमूर्ती, विद्युत रोषणाई आणि भक्तांचा उत्साह यामुळे मंडळाचा गणेशोत्सव यंदा विशेष आकर्षण ठरत आहे. गणरायाच्या आगमनापासूनच मंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

इगतपुरीत फेरफार नोंदीतील अनियमितता उघड; महसूल अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा

जन सम्राट टाईम्स



नाशिक। प्रतिनिधी: इगतपुरी तालुक्यात गावनिहाय महसूल फेरफार नोंदी हाताळताना झालेल्या अनियमिततेची गंभीर दखल घेत प्रांताधिकारी पवन दत्ता यांनी महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केली आहे. दफ्तर तपासणीदरम्यान नियमबाह्य पद्धतीने फेरफार नोंदी हाताळल्याचे तसेच आवश्यक कागदपत्रे व नोटिसांच्या प्रक्रियेत त्रुटी आढळून आल्याने एका मंडळ अधिकाऱ्यासह पाच तलाठ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमुळे इगतपुरी तालुक्यातील महसूल विभागात खळबळ उडाली आहे. दफ्तर तपासणीत अनियमितता उघड प्रांताधिकारी पवन दत्ता यांच्या मार्गदर्शनाखाली इगतपुरी तालुक्यातील तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या दफ्तरांची तपासणी करण्यात आली. यावेळी मुकणे, वाडीवऱ्हे, मुंढेगाव, सांजेगाव आणि गोंदे दुमाला येथील महसूल कामकाजाची तपासणी करण्यात आली. या तपासणीत फेरफार नोंदी करताना संबंधितांना आवश्यक नोटिसा न बजावता प्रक्रिया पूर्ण करणे, अधिकारक्षेत्राबाहेर जाऊन फेरफार नोंदी घेणे, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी न करणे तसेच खातेदार व संबंधित हितसंबंधित व्यक्तींना नोटीस न देता फेरफार प्रक्रिया पूर्ण केल्याच्या त्रुटी निदर्शनास आल्या. महसूल नोंदी या नागरिकांच्या जमीनमालकी आणि हक्कांशी थेट संबंधित असल्याने या प्रक्रियेत नियमांचे पालन होणे आवश्यक असते. त्यामुळे प्रशासनाने या त्रुटींची गंभीर दखल घेत संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई केली. मंडळ अधिकाऱ्यावरही जबाबदारी निश्चित वाडीवऱ्हेचे मंडळ अधिकारी बबन कोकाटे यांच्या दफ्तर तपासणीत अधिनस्त तलाठ्यांच्या कामकाजावर आवश्यक नियंत्रण व देखरेख नसल्याचे आढळून आल्याचे प्रशासनाकडून नमूद करण्यात आले आहे. तसेच ई-ऑफिस प्रणालीद्वारे नामंजूर झालेल्या फेरफार नोंदींमध्ये संबंधित तलाठ्यांकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यात कसूर झाल्याचेही तपासणीत निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर मंडळ अधिकारी बबन कोकाटे यांच्यावरही शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे. तीन तलाठी निलंबित प्रांताधिकाऱ्यांच्या आदेशानुसार तीन तलाठ्यांचे निलंबन करण्यात आले आहे. त्यापैकी एका तलाठ्याविरोधात विभागीय चौकशीचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आला आहे. उर्वरित दोन तलाठ्यांसह मंडळ अधिकारी बबन कोकाटे यांची प्रत्येकी एक वेतनवाढ रोखण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सोयगाव येथे माहिती अधिकार कार्यकर्त्यांची कार्यशाळा उत्साहात

प्रभावी वापर करण्याबाबत शेख गुलाब मामू यांचे मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स



सोयगाव शहर | प्रतिनिधी: नागरिकांना शासकीय प्रशासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्यासाठी माहितीचा अधिकार कायदा हे प्रभावी माध्यम आहे. या कायद्याचा योग्य व कायदेशीर पद्धतीने वापर कसा करावा, याबाबत माहिती अधिकार कार्यकर्त्यांसाठी आयोजित कार्यशाळा सोयगाव येथे उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत अर्ज कसा करावा, कोणत्या कार्यालयाकडे माहिती मागावी, माहिती उपलब्ध न झाल्यास प्रथम व द्वितीय अपीलाची प्रक्रिया कशी राबवावी, तसेच माहिती अधिकाराचा वापर करताना कोणती काळजी घ्यावी, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यशाळेदरम्यान उपस्थित माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी विविध शासकीय विभागांकडून माहिती मिळविताना येणाऱ्या अडचणी, अपूर्ण माहिती तसेच माहिती देण्यास होणारा विलंब याबाबत चर्चा केली. नागरिकांच्या विविध प्रश्नांसाठी आणि शासकीय कामकाजात अधिक पारदर्शकता आणण्यासाठी माहिती अधिकार कायद्याचा प्रभावी वापर करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. यावेळी आगामी २८ सप्टेंबर रोजी माहिती अधिकार दिन साजरा करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेख रशीद होते, तर माहिती अधिकार कायद्याबाबत शेख गुलाब मामू यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमुळे माहिती अधिकार कायद्याबाबत जनजागृती होण्यास मदत झाली असून, कार्यकर्त्यांना अधिक प्रभावीपणे काम करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन मिळाले. कार्यक्रमास संदीप इंगळे, दिलीप शिंदे, ईश्वर इंगळे, विजय पगारे, वाल्मीक चव्हाण, अशोक ढगे, शेख सुलेमान, ज्ञानेश्वर गाडेकर, विजय भारवाड यांच्यासह सोयगाव परिसरातील माहिती अधिकार कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.नागरिकांना शासकीय प्रशासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्यासाठी माहितीचा अधिकार कायदा हे प्रभावी माध्यम आहे. या कायद्याचा योग्य व कायदेशीर पद्धतीने वापर कसा करावा, याबाबत माहिती अधिकार कार्यकर्त्यांसाठी आयोजित कार्यशाळा सोयगाव येथे उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत अर्ज कसा करावा, कोणत्या कार्यालयाकडे माहिती मागावी, माहिती उपलब्ध न झाल्यास प्रथम व द्वितीय अपीलाची प्रक्रिया कशी राबवावी, तसेच माहिती अधिकाराचा वापर करताना कोणती काळजी घ्यावी, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यशाळेदरम्यान उपस्थित माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी विविध शासकीय विभागांकडून माहिती मिळविताना येणाऱ्या अडचणी, अपूर्ण माहिती तसेच माहिती देण्यास होणारा विलंब याबाबत चर्चा केली.

राखी व शुभेच्छापत्राची पंतप्रधान कार्यालयाकडून दखल

जन सम्राट टाईम्स

जळगाव | प्रतिनिधी: रक्षा बंधनाच्या पावन पर्वानिमित्त रुस्तमजी इंटरनॅशनल स्कूलमधील इयत्ता सहावीची विद्यार्थिनी कु. अरुश्री परिक्षीत बाविस्कर हिने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देशसेवा व राष्ट्रकल्याणासाठी उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभावे, या सदिच्छेने राखी व शुभेच्छापत्र पाठविले होते. अरुश्रीने पाठविलेल्या या स्नेहबंधाची पंतप्रधान कार्यालयाने दखल घेतली असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिला विशेष पत्र पाठवून कौतुक व आभार व्यक्त केले आहेत. लोकनियुक्त नगराध्यक्ष तथा प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. परिक्षीत श्रीरामजी बाविस्कर आणि डॉ. सौ. स्वाती परिक्षीत बाविस्कर यांची कन्या असलेल्या अरुश्रीने आपल्या आई-वडिलांकडून मिळालेल्या सामाजिक बांधिलकीच्या संस्कारातून हा उपक्रम केला. रक्षा बंधनानिमित्त अरुश्रीने पंतप्रधानांना पाठविलेल्या राखी व शुभेच्छापत्रातून देशाच्या नेतृत्वाविषयी असलेला आदर आणि राष्ट्रकल्याणाची भावना व्यक्त केली होती. तिचे पत्र व राखी नवी दिल्ली येथील पंतप्रधान कार्यालयात प्राप्त झाल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी तिला विशेष स्नेहपत्र पाठविले. या पत्रातू पंतप्रधानांनी अरुश्रीच्या भावनेचे कौतुक केले. देशातील मुली व विद्यार्थिनी विकसित भारताच्या निर्मितीत विविध क्षेत्रांत योगदान देत असून, क्रीडा, कौशल्य, शिक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आहेत, असे त्यांनी नमूद केले. मुली व महिला राष्ट्रकल्याणासाठी स्वयंस्फूर्तीने योगदान देत आपल्या सामर्थ्याचा परिचय करून देत असल्याबद्दलही त्यांनी गौरवोद्गार काढले. पंतप्रधानांकडून आलेले विशेष स्नेहपत्र मिळाल्याने अरुश्री बाविस्कर हिच्या कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण असून, तिच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. विद्यार्थिदशेतच देशसेवा, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रहिताची भावना जोपासण्याचा हा उपक्रम प्रेरणादायी ठरत आहे.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा काळ्या फिती लावून निषेध!



जन सम्राट टाईम्स

पाचोरा| प्रतिनिधी: कणा म्हणून कार्यरत असलेल्या दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित वेतनवाढीच्या मागणीसाठी पाचोरा येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी आज काळ्या फिती लावून कामकाज करत शासनाचा निषेध नोंदविला. दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा प्रश्न गेल्या तब्बल २० वर्षांपासून प्रलंबित आहे. वर्षानुवर्षे शिस्तीने व प्रामाणिकपणे सेवा बजावूनही वेतनवाढीच्या मागणीकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या संयमाचा अंत झाला असून, शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाने दिला आहे.

दुय्यम न्यायालयांमध्ये उपलब्ध मनुष्यबळाच्या तुलनेत कामाचे प्रमाण मोठे असल्याने कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण असल्याचे महासंघाचे म्हणणे आहे. अनेक कर्मचाऱ्यांना सकाळपासून संध्याकाळपर्यंत, तर काही वेळा रात्रीपर्यंत काम करावे लागते. असे असतानाही इतर शासकीय विभागांच्या तुलनेत वेतन व सेवासुविधांमध्ये तफावत असल्याचा दावा कर्मचाऱ्यांनी केला आहे. दरम्यान, ३१ जानेवारी २०२५ रोजी उच्च न्यायालयाने दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीबाबतचा प्रस्ताव विधी व न्याय विभागामार्फत राज्य शासनाकडे पाठविला होता. मात्र, त्यानंतर १८ महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही शासनाकडून निर्णय झालेला नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. आंदोलनाची टप्प्याटप्प्याने रूपरेषा महासंघाच्या बैठकीत प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलनाची टप्प्याटप्प्याने रूपरेषा निश्चित करण्यात आली आहे. १६ सप्टेंबर २०२६ — काळ्या फिती लावून निषेध. १६ व १७ ऑक्टोबर २०२६ — काळ्या फिती लावून कामकाज. ५ नोव्हेंबर २०२६ — सामूहिक रजा. ६ व ७ नोव्हेंबर २०२६ — पुन्हा निषेध आंदोलन. १६ नोव्हेंबर २०२६ पासून — मागण्यांवर निर्णय न झाल्यास बेमुदत संप. विविध जिल्ह्यांतील वकील संघटना तसेच लोकप्रतिनिधींनी या आंदोलनाला पाठिंबा दिल्याचे कर्मचारी महासंघाकडून सांगण्यात आले.

उधना-पुणे रेल्वे सुरु होण्याआधीच श्रेयवादाची एक्स्प्रेस सुसाट

हिना गावित आणि चंद्रकांत रघुवंशी यांच्यात रस्सीखेच

जन सम्राट टाईम्स

नंदुरबार। प्रतिनिधी : नंदुरबार जिल्ह्यातील प्रवाशांची पुण्याशी थेट रेल्वे जोडणीची जुनी मागणी आता चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. मात्र, उधना-पुणे प्रस्तावित अमृत भारत एक्स्प्रेसच्या हालचालींना वेग येताच या गाडीच्या पाठपुराव्याचे श्रेय नेमके कुणाचे? यावरून भाजपच्या माजी खासदार हिना गावित आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्या समर्थकांमध्ये श्रेयाची रस्सीखेच सुरू झाली आहे. हिना गावित यांच्या प्रसिद्धीपत्रकात ही मागणी त्यांनी खासदार असताना तत्कालीन रेल्वेमंत्र्यांकडे तसेच रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने मांडल्याचा दावा करण्यात आला आहे. पुण्यासाठी स्वतंत्र रेल्वे सुरू करण्याची मागणी व्यापारी, व्यावसायिक, विद्यार्थी आणि प्रवाशांची अनेक वर्षांपासून असल्याचेही त्यात नमूद करण्यात आले आहे. त्यांच्या पाठपुराव्यामुळे अखेर उधना-पुणे अमृत भारत एक्स्प्रेसला मंजुरी मिळाल्याचा दावा करण्यात आला आहे. जेवल्यानंतर लगेच शौचास पळावं लागतं? सावधान..! हे आतड्यांच्या भयंकर आजाराचे लक्षण? वेळीच व्हा सावध! पोट साफ



होण्यासाठी करा 'हे' सोपे उपाय Surya Gochar 2026 : सूर्य गोचर कन्या राशीत, 4 राशींसाठी धोक्याची घंटा, रहावे सतर्क, जाणून घ्या उपाय! सारा तेंडुलकरने शेअर केले घरच्या गणेशोत्सवाचे फोटो, साडीतील मोहक लुकने जिंकले चाहत्यांचे मनचंद्रकांत रघुवंशी यांचा दावा काय? दुसरीकडे, आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्या प्रसिद्धीपत्रकातही याच गाडीच्या मागणीसाठी रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केल्याचे सांगण्यात आले आहे. तत्कालीन रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, नंदुरबार रेल्वे स्थानकाच्या पाहणीसाठी आले असताना निवेदन दिले होते, तसेच पश्चिम रेल्वेच्या महाव्यवस्थापकांनाही काही महिन्यांपूर्वी निवेदन सादर केल्याचा दावा रघुवंशी यांच्या गटाकडून करण्यात आला आहे. म्हणजेच गाडीची मागणी एक, पाठपुराव्याचे दावे दोन आणि श्रेयासाठी राजकीय रस्सीखेचही दोन बाजूंनी! नंदुरबारकरांना पुण्याला थेट रेल्वे मिळावी, ही मागणी नवी नसून उत्तर महाराष्ट्रातील प्रवाशांकडून ती अनेक वर्षांपासून केली जात आहे. यापूर्वीही उधना-पुणे मार्गावर नवीन रेल्वे सुरू करण्याबाबत रेल्वे प्रशासनाच्या पातळीवर हालचाली झाल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. कसा असू शकतो नव्या ट्रेनचा मार्ग? एप्रिल २०२६ मध्ये जळगावमार्गे उधना-पुणे गाडीच्या प्रस्तावावर चर्चा झाल्याचे आणि जळगाव येथे इंजिन बदलण्याच्या तांत्रिक अडचणीवर अमृत भारत रेकचा पर्याय विचाराधीन असल्याचे वृत्त आले होते. नंदुरबार, अमळनेर, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, मनमाडमार्गे उधना-पुणे गाडीच्या प्रस्तावावर मध्य रेल्वेच्या पातळीवर सकारात्मक चर्चा झाल्याचे समोर आले आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

कोर्टात जोरदार युक्तिवाद; अखेर संतोष पंडित यांना जामीन!

पुणे सत्र न्यायालयाचा निर्णय; २५ हजारांच्या जातमुचलक्यावर सुटका, फिर्यादीशी संपर्क न साधण्याची अट

जन सम्राट टाईम्स

पुणे । प्रतिनिधी: मंत्री चंद्रकांत पाटील आणि पुणे महानगरपालिकेतील एका महिला नगरसेविकेबाबत यूट्यूबवर आक्षेपार्ह व लैंगिक स्वरूपाच्या शेरेबाजीचे व्हिडीओ प्रसारित केल्याच्या आरोपाखाली अटकेत असलेले युट्युबर संतोष पंडित यांना अखेर पुणे सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला. अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. यू. वडगावकर यांच्या न्यायालयात झालेल्या सुनावणीत दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने पंडित यांची २५ हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर आणि तेवढ्याच रकमेच्या हमीदारावर सुटका करण्याचे आदेश दिले. पुण्यातील ३६ वर्षीय सारिका कांबळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून कोथरूड पोलीस ठाण्यात संतोष पंडित यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तक्रारीनुसार, पंडित यांनी यूट्यूबवर मंत्री चंद्रकांत पाटील तसेच एका महिला नगरसेविकेबाबत आक्षेपार्ह व गैरसमज निर्माण करणारे व्हिडीओ पोस्ट केल्याचा आरोप करण्यात आला होता. मुख्यमंत्र्यांबाबतही यापूर्वी अशाच प्रकारची विधाने करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते. या प्रकरणी कोथरूड पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ मधील कलम ७५(१)(iv), ७५(३), ३५६(२), ३५२ तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६७ अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. पाच दिवस पोलीस कोठडी, त्यानंतर न्यायालयीन कोठडी गुन्हा दाखल झाल्यानंतर संतोष पंडित यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली होती. त्यानंतर त्यांना न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले. जामीन अर्जावर पुणे सत्र न्यायालयात सुनावणी झाली असता दोन्ही बाजूंनी जोरदार युक्तिवाद करण्यात आला. वकिलांचा युक्तिवाद काय? संतोष पंडित यांच्या वकिलांनी न्यायालयात बाजू मांडताना संबंधित शब्दांचा हेतुपुरस्सर गैरवापर करण्यात आलेला नाही, तसेच महिलेच्या लज्जेचा अनादर करण्याचा कोणताही हेतू आरोपीचा नव्हता, असा युक्तिवाद केला. तसेच, दाखल गुन्ह्यांचे स्वरूप आणि संबंधित कलमांमध्ये असलेल्या शिक्षेच्या तरतुदी लक्षात घेता आरोपीला पुढे कोठडीत ठेवण्याची आवश्यकता नसल्याचेही बचाव पक्षाने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. 'व्हिडीओ आणि पोस्ट तपास अधिकाऱ्यांच्या ताब्यात' दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, संबंधित व्हिडीओ आणि पोस्ट यापूर्वीच तपास अधिकाऱ्यांच्या ताब्यात आहेत. आरोपीचा हेतू हा तपास आणि पुढील खटल्याचा विषय असल्याचे न्यायालयाने नमूद केले. संबंधित गुन्ह्यांसाठी जास्तीत जास्त तीन वर्षांपर्यंतच्या शिक्षेची तरतूद असल्याने तपास पूर्ण करण्यासाठी आरोपीला कोठडीत ठेवणे आवश्यक वाटत नसल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले. सरकारी पक्षाकडून व्यक्त करण्यात आलेल्या भीतीला ठोस आधार नसून त्या केवळ संशयावर आधारित असल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने संतोष पंडित यांचा जामीन अर्ज मंजूर केला. फिर्यादीशी संपर्क साधण्यास मनाई



न्यायालयाने संतोष पंडित यांची २५ हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर आणि तेवढ्याच रकमेच्या हमीदारावर सुटका करण्याचे आदेश दिले. मात्र, जामीन मंजूर करताना न्यायालयाने काही अटीही घातल्या आहेत. त्यामध्ये आरोपीने फिर्यादीशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संपर्क साधू नये, तसेच प्रकरणातील पुराव्यांशी कोणत्याही प्रकारे छेडछाड करू नये, अशा प्रमुख अटींचा समावेश आहे. मंत्री चंद्रकांत पाटील आणि पुणे महानगरपालिकेतील एका महिला नगरसेविकेबाबत यूट्यूबवर आक्षेपार्ह व लैंगिक स्वरूपाच्या शेरेबाजीचे व्हिडीओ प्रसारित केल्याच्या आरोपाखाली अटकेत असलेले युट्युबर संतोष पंडित यांना अखेर पुणे सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला. अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. यू. वडगावकर यांच्या न्यायालयात झालेल्या सुनावणीत दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने पंडित यांची २५ हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर आणि तेवढ्याच रकमेच्या हमीदारावर सुटका करण्याचे आदेश दिले. पुण्यातील ३६ वर्षीय सारिका कांबळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून कोथरूड पोलीस ठाण्यात संतोष पंडित यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तक्रारीनुसार, पंडित यांनी यूट्यूबवर मंत्री चंद्रकांत पाटील तसेच एका महिला नगरसेविकेबाबत आक्षेपार्ह व गैरसमज निर्माण करणारे व्हिडीओ पोस्ट केल्याचा आरोप करण्यात आला होता. मुख्यमंत्र्यांबाबतही यापूर्वी अशाच प्रकारची विधाने करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते. या प्रकरणी कोथरूड पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ मधील कलम ७५(१)(iv), ७५(३), ३५६(२), ३५२ तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६७ अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. पाच दिवस पोलीस कोठडी, त्यानंतर न्यायालयीन कोठडी गुन्हा दाखल झाल्यानंतर संतोष पंडित यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली होती. त्यानंतर त्यांना न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले. जामीन अर्जावर पुणे सत्र न्यायालयात सुनावणी झाली असता दोन्ही बाजूंनी जोरदार युक्तिवाद करण्यात आला. वकिलांचा युक्तिवाद काय? संतोष पंडित यांच्या वकिलांनी न्यायालयात बाजू मांडताना संबंधित शब्दांचा हेतुपुरस्सर गैरवापर करण्यात आलेला नाही, तसेच महिलेच्या लज्जेचा अनादर करण्याचा कोणताही हेतू आरोपीचा नव्हता, असा युक्तिवाद केला. तसेच, दाखल गुन्ह्यांचे स्वरूप आणि संबंधित कलमांमध्ये असलेल्या शिक्षेच्या तरतुदी लक्षात घेता आरोपीला पुढे कोठडीत ठेवण्याची आवश्यकता नसल्याचेही बचाव पक्षाने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. 'व्हिडीओ आणि पोस्ट तपास अधिकाऱ्यांच्या ताब्यात' दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, संबंधित व्हिडीओ आणि पोस्ट यापूर्वीच तपास अधिकाऱ्यांच्या ताब्यात आहेत. आरोपीचा हेतू हा तपास आणि पुढील खटल्याचा विषय असल्याचे न्यायालयाने नमूद केले. संबंधित गुन्ह्यांसाठी जास्तीत जास्त तीन वर्षांपर्यंतच्या शिक्षेची तरतूद असल्याने तपास पूर्ण करण्यासाठी आरोपीला कोठडीत ठेवणे आवश्यक वाटत नसल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले. यांचा जामीन अर्ज मंजूर केला. फिर्यादीशी संपर्क साधण्यास मनाई न्यायालयाने संतोष पंडित यांची २५ हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर आणि तेवढ्याच रकमेच्या हमीदारावर सुटका करण्याचे आदेश दिले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान अभियान



जन सम्राट टाईम्स

पारोळा | प्रतिनिधी : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या 'सेवा संकल्प अभियानाच्या' माध्यमातून अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, स्थलांतरित समाज तसेच विविध वंचित घटकांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचवावा, अशा सूचना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या. यासंदर्भात संबंधित गटविकास अधिकारी व तहसीलदार यांच्याशी समन्वय साधून जिल्हास्तरीय यंत्रणेने पात्र लाभार्थ्यांचा शोध घ्यावा. तसेच त्यांना आवश्यक शासकीय दाखले व कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही करावी, असे निर्देश बावनकुळे यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.

बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. 'प्रधानमंत्री सूर्यघर' योजनेचा लाभ 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना' अंतर्गत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील १०० युनिटपर्यंत वीज वापर असलेल्या कुटुंबांना लाभ मिळवून देण्यासाठी सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास विभागाने पुढाकार घ्यावा, असेही निर्देश देण्यात आले.

केंद्र शासनाच्या निधीव्यतिरिक्त आवश्यक असलेली तफावत जिल्हा नियोजन समिती अथवा सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभागाच्या निधीतून पूर्ण करण्याची कार्यवाही करावी. पात्र कुटुंबांना ही योजना संपूर्ण अनुदानावर उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने नियोजन करावे, असेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले. गरजूंपर्यंत धान्य पोहोचविण्याचा उपक्रम सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत ज्या शिधापत्रिकाधारकांना धान्याची आवश्यकता नाही, अशा लाभार्थ्यांना विश्वासात घेऊन त्यांच्या संमतीने आणि प्रचलित नियमांनुसार उपलब्ध धान्य गरजू नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची कार्यवाही करावी.

असे निर्देशही महसूल मंत्री बावनकुळे यांनी दिले.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या 'सेवा संकल्प अभियानाच्या' माध्यमातून अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, स्थलांतरित समाज तसेच विविध वंचित घटकांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचवावा. अशा सूचना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या. यासंदर्भात संबंधित गटविकास अधिकारी व तहसीलदार यांच्याशी समन्वय साधून जिल्हास्तरीय यंत्रणेने पात्र लाभार्थ्यांचा शोध घ्यावा. तसेच त्यांना आवश्यक शासकीय दाखले व कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही करावी.

मराठा बांधवांसाठी ग्रामस्थांकडून नाश्ता व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

एकजुटीच्या उपक्रमाची परिसरात चर्चा

जन सम्राट टाईम्स

अहिल्यानगर। प्रतिनिधी: मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईच्या दिशेने निघालेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर साकत ग्रामस्थांनी आंदोलकांसाठी नाश्ता आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली. बुधवार, १६ सप्टेंबर २०२६ रोजी पाटोदा तालुक्यातून मुंबईच्या दिशेने मार्गस्थ झालेल्या मोर्चातील आंदोलकांसाठी हा उपक्रम राबविण्यात आला. घरदार सोडून मुंबईच्या दिशेने निघालेल्या आंदोलकांना प्रवासादरम्यान आवश्यक सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने समस्त साकत ग्रामस्थांच्या वतीने 'अन्नछत्र' उभारण्यात आले. मार्गावरून जाणाऱ्या हजारो आंदोलकांसाठी गरम नाश्ता तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली. हजारो बांधवांसाठी नाश्त्याची व्यवस्था मोर्चात सहभागी झालेले तसेच मार्गावरून जाणारे आंदोलक यांच्यासाठी ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात नाश्त्याची तयारी केली



होती. सकाळच्या वेळेत प्रवास करणाऱ्या आंदोलकांना या व्यवस्थेचा लाभ मिळाला. साकत ग्रामस्थांनी केलेल्या या उपक्रमामुळे मोर्चाच्या मार्गावर काही काळ सामूहिक भोजनाची व्यवस्था पाहायला मिळाली. ग्रामस्थांच्या या उपक्रमाची परिसरात चर्चा होत असून, आंदोलनाच्या मार्गावर स्थानिक नागरिकांकडून करण्यात येणाऱ्या मदतीचे हे एक उदाहरण ठरले आहे. 'माणुसकीची सेवा' म्हणून ग्रामस्थांचा पुढाकार मोर्चात सहभागी नागरिकांसाठी अन्न व पाण्याची व्यवस्था करत साकत ग्रामस्थांनी सामाजिक सहभागाचा परिचय दिला. मोठ्या संख्येने नागरिक मार्गस्थ होत असताना त्यांच्या मूलभूत गरजांसाठी स्थानिक पातळीवर करण्यात आलेल्या या व्यवस्थेमुळे प्रवासादरम्यान आंदोलकांना दिलासा मिळाला. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईच्या दिशेने निघालेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर साकत ग्रामस्थांनी आंदोलकांसाठी नाश्ता आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली. बुधवार, १६ सप्टेंबर २०२६ रोजी पाटोदा तालुक्यातून मुंबईच्या दिशेने मार्गस्थ झालेल्या मोर्चातील आंदोलकांसाठी हा उपक्रम राबविण्यात आला. घरदार सोडून मुंबईच्या दिशेने निघालेल्या आंदोलकांना प्रवासादरम्यान आवश्यक सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने समस्त साकत ग्रामस्थांच्या वतीने 'अन्नछत्र' उभारण्यात आले. मार्गावरून जाणाऱ्या हजारो आंदोलकांसाठी गरम नाश्ता तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली. हजारो बांधवांसाठी नाश्त्याची व्यवस्था मोर्चात सहभागी झालेले तसेच मार्गावरून जाणारे आंदोलक यांच्यासाठी ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात नाश्त्याची तयारी केली

खासदार चंद्रशेखर आझाद यांच्यावरील हल्ल्याची उच्चस्तरीय चौकशी करा!

जन सम्राट टाईम्स

जळगाव। (प्रतिनिधी): भीम आर्मी व आझाद समाज पार्टीचे संस्थापक-अध्यक्ष तथा नगीना लोकसभा मतदारसंघाचे खासदार चंद्रशेखर आझाद यांच्यावर शाहाबाद येथील टोल गेटवर झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर या घटनेची उच्चस्तरीय, निष्पक्ष, स्वतंत्र आणि कालबद्ध चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागणीसंदर्भात भीम आर्मी भारत एकता मिशनच्या जळगाव जिल्हा कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी, जळगाव यांच्यामार्फत राष्ट्रपती महोदया यांना निवेदन सादर करण्यात आले. हल्ल्यात सहभागी असलेल्या आरोपींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच या घटनेमागे कोणतेही पूर्वनियोजित षड्यंत्र किंवा सूत्रधार असल्यास त्याची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. तसेच खासदार चंद्रशेखर आझाद यांच्या सुरक्षा व्यवस्थेचा तातडीने आढावा घेऊन त्यांच्या सुरक्षेला असलेल्या संभाव्य धोक्याचे



गांभीर्य लक्षात घेता Z+ सुरक्षा प्रदान करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. लोकशाही व्यवस्थेत लोकप्रतिनिधींच्या सुरक्षिततेला महत्त्व असून, अशा घटनांची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास लोकशाही व संविधानिक मार्गाने महाराष्ट्रभर शांततापूर्ण आंदोलन करण्यात येईलमुबारक तडवी, विद्यासागर खरात, अल्केश मोरे, राहुल जयकर, सुपडू सदानशिव, जुम्मा तडवी, विनोद सोनवणे, अनिल मोरे, शकील शेख, वैशाली पाटील, संगीता दया, रेखा पाटील, शारदा तायडे, जय सपकाळे, चंद्रमणी मोरे, विशाल वाघमारे आदी उपस्थित होते. भीम आर्मी व आझाद समाज पार्टीचे संस्थापक-अध्यक्ष तथा नगीना लोकसभा मतदारसंघाचे खासदार चंद्रशेखर आझाद यांच्यावर शाहाबाद येथील टोल गेटवर झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर या घटनेची उच्चस्तरीय, निष्पक्ष, स्वतंत्र आणि कालबद्ध चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागणीसंदर्भात भीम आर्मी भारत एकता मिशनच्या जळगाव जिल्हा कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी, जळगाव यांच्यामार्फत राष्ट्रपती महोदया यांना निवेदन सादर करण्यात आले. हल्ल्यात सहभागी असलेल्या आरोपींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच या घटनेमागे कोणतेही पूर्वनियोजित षड्यंत्र किंवा सूत्रधार असल्यास त्याची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

कुऱ्हा हरदो शाळेत 'Good Touch–Bad Touch'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सुरक्षिततेचे धडे!

जन सम्राट टाईम्स

कुऱ्हा हरदो। प्रतिनिधी: जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कुऱ्हा हरदो येथे शेलवड केंद्राच्या केंद्रप्रमुख आदरणीय प्रतिमा चौधरी मॅडम यांच्या संकल्पनेतून 'विद्यार्थी सुरक्षा' अंतर्गत 'Good Touch–Bad Touch' हा महत्त्वपूर्ण उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान केंद्रप्रमुख प्रतिमा चौधरी मॅडम यांनी भूषविले. इयत्ता सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांनी 'स्वागतम् सुस्वागतम्' या गीताने उपस्थित मान्यवरांचे



स्वागत केले. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी न. ह. राका हायस्कूल येथे कार्यरत असलेले उपक्रमशील शिक्षक तथा समुपदेशक दीपक चौधरी सर प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी केंद्रप्रमुख प्रतिमा चौधरी मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना 'Good Touch–Bad Touch' या विषयाची माहिती प्रत्येक विद्यार्थ्याला असणे ही आजच्या काळाची गरज आहे, असे सांगितले. समुपदेशन सत्रात दीपक चौधरी सरांनी विद्यार्थ्यांशी अतिशय आपुलकीने संवाद साधत, सोप्या भाषेत, हसत-खेळत आणि कृतीयुक्त पद्धतीने विद्यार्थी सुरक्षिततेच्या विविध पैलूंची माहिती दिली. विविध चार्टच्या माध्यमातून 'Good Touch–Bad Touch' तसेच सुरक्षिततेशी संबंधित महत्त्वाच्या बाबी विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आल्या. संवादादरम्यान विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारून त्यांच्या आकलनाची पडताळणी करण्यात आली. योग्य व समर्पक उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहनपर पेनचे बक्षीस देण्यात आले. याप्रसंगी केंद्रस्तरीय 'Spelling Bee' स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा केंद्रप्रमुख प्रतिमा चौधरी मॅडम व समुपदेशक दीपक चौधरी सर यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. तणावमुक्त व आनंददायी वातावरणात पार पडलेल्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांना सुरक्षिततेसोबतच चांगल्या सवयी अंगीकारणे, आई-वडील व मोठ्यांचा आदर करणे, थोर व्यक्तींची पुस्तके वाचणे, रोजनिशी लिहिणे तसेच सामान्यज्ञान वाढविणे याबाबतही मार्गदर्शन मिळाले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन डॉ. वैशाली संसारे यांनी केले. यावेळी शाळेचे ग्रेडेड मुख्याध्यापक आदरणीय कोठाळे दादा तसेच सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत हा उपक्रम यशस्वी केला.

कार्यालयात 'रील' करणे तहसीलदारांच्या अंगलट

रिसोड तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या संपूर्ण प्रशासकीय कामकाजाची विशेष पथकामार्फत चौकशी

जन सम्राट टाईम्स

भुसावळ । प्रतिनिधी: वाशीम जिल्ह्यातील रिसोड तहसील कार्यालयात शासकीय कामकाजादरम्यान 'सिनेमॅटिक रील'चे चित्रीकरण केल्याच्या प्रकरणाची राज्य शासनाने गंभीर दखल घेतली आहे. तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या रिसोड तहसीलदार पदावरील संपूर्ण प्रशासकीय कामकाजाची विशेष पथकामार्फत चौकशी करण्याचे आदेश महसूल व वन विभागाने अमरावती विभागीय आयुक्तांना दिले आहेत. त्यामुळे 'रील' प्रकरणामुळे तहसीलदार तेजनकर यांच्या अडचणी वाढल्या आहेत. शासकीय कार्यालयातच 'फिल्मी स्टाईल' चित्रीकरण



तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी रिसोड तहसील कार्यालयातील शासकीय खुर्चीवर बसून, फायलींवर स्वाक्षरी करतानाचे तसेच विविध 'फिल्मी स्टाईल' रील्सचे चित्रीकरण केल्याचा आरोप आहे. या रील्स समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर या प्रकाराची चर्चा सुरू झाली. जनतेच्या शासकीय कामांसाठी असलेल्या तहसील कार्यालयाचा वैयक्तिक प्रसिद्धीसाठी वापर केल्याचा आरोप करण्यात आला. या प्रकारामुळे शासकीय कार्यालयातील प्रशासकीय शिस्त आणि नियमांच्या पालनाबाबत प्रश्न उपस्थित झाले. शासकीय यंत्रणेच्या वापराबाबतही प्रश्न या प्रकरणात महसूल यंत्रणेतील कर्मचाऱ्यांसह कोतवालांचाही वैयक्तिक प्रसिद्धीसाठी वापर करण्यात आल्याची चर्चा झाली. शासकीय कर्तव्याच्या वेळेत रील्सचे चित्रीकरण आणि त्यासाठी यंत्रणेचा वापर झाल्याचा आरोप करत संबंधितांवर कारवाईची मागणी करण्यात आली होती. विशेष पथकाकडून संपूर्ण कामकाजाची तपासणी महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाचे अवर सचिव प्रवीण पाटील यांनी काढलेल्या शासकीय पत्रानुसार, प्रतीक्षा तेजनकर रिसोड तहसीलदार पदावर कार्यरत असताना केलेल्या संपूर्ण प्रशासकीय कामकाजाची विशेष पथकामार्फत तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. चौकशी पूर्ण करून त्याचा अहवाल विभागीय आयुक्तांच्या अभिप्रायासह एका महिन्याच्या आत शासनाकडे सादर करावा, असेही निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे आता विशेष पथकाच्या चौकशीत नेमके कोणते तथ्य समोर येते, याकडे महसूल विभागासह सर्वांचे लक्ष लागले आहे.वाशीम जिल्ह्यातील रिसोड तहसील कार्यालयात शासकीय कामकाजादरम्यान 'सिनेमॅटिक रील'चे चित्रीकरण केल्याच्या प्रकरणाची राज्य शासनाने गंभीर दखल घेतली आहे. तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या रिसोड तहसीलदार पदावरील संपूर्ण प्रशासकीय कामकाजाची विशेष पथकामार्फत चौकशी करण्याचे आदेश महसूल व वन विभागाने अमरावती विभागीय आयुक्तांना दिले आहेत.

पारोळ्यात लोकअदालत तडजोडीच्या माध्यमातून प्रलंबित प्रकरणे निकाली

जन सम्राट टाईम्स

पारोळा | प्रतिनिधी: महसूल व वनविभागाच्या दि. १४ ऑगस्ट २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार पारोळा तहसील कार्यालयात 'महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोकअदालत अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून महसूल विभागाकडील प्रलंबित अर्धन्यायिक स्वरूपाची प्रकरणे परस्पर तडजोडीच्या माध्यमातून निकाली काढण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. दि. १ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत हे अभियान राबविण्यात येणार असून, तहसीलदार, नायब तहसीलदार तसेच मंडळ अधिकारी यांच्या स्तरावरील विविध महसूलविषयक दाव्यांचा त्यामध्ये समावेश आहे. प्रलंबित प्रकरणांतील संबंधित पक्षकारांना नोटिसा बजावून लोकअदालतीस उपस्थित राहण्याचे कळविण्यात आले आहे. दोन्ही पक्षकारांनी परस्पर संमती दर्शविल्यास संबंधित प्रकरण तडजोडीच्या माध्यमातून प्राधान्याने निकाली काढण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम वाचण्यास मदत होणार असून, दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या महसुली वादांवर सामंजस्याने तोडगा काढण्याची संधी उपलब्ध होणार आहे. पारोळा तालुक्यातील संबंधित पक्षकार तसेच त्यांचे वकील यांनी गुरुवार, दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पारोळा तहसील कार्यालयात आयोजित लोकअदालतीस उपस्थित राहावे, असे आवाहन तहसीलदार डॉ. उल्हास देवरे यांनी केले आहे. या उपक्रमामुळे महसुली प्रकरणांच्या तडजोडीने निपटाऱ्याला चालना मिळून नागरिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

॥ गौरी आवाहन ते गौरी विसर्जन ॥

गणपती बसल्यानंतर दुसऱ्या दिवशी ऋषीपंचमी आणि यानंतर होते ते गौरी आवाहन. गौरी पूजन हे देखील भाद्रपद महिन्यातील महत्वाचे व्रत आहे. ज्येष्ठा गौरीचे प्रत्येकाकडे आपआपल्या परंपरेप्रमाणे पूजन होते. गौरी आवाहन ते गौरी विसर्जन यादरम्यान काय काय केले जाते. याची माहिती खास महाईन्यूजच्या वाचकांसाठी...

अखंड सौभाग्यप्राप्तीसाठी स्त्रिया भाद्रपद महिन्याच्या शुद्ध पक्षात गौरींचे पूजन करतात. एका पौराणिक कथेनुसार, असुरांच्या त्रासाला कंटाळून सर्व स्त्रिया आपले सौभाग्य अक्षय करण्यासाठी गौरीला शरण गेल्या. तिची प्रार्थना केली. गौरीने भाद्रपद शुद्ध अष्टमीला असुरांचा संहार केला. तेव्हापासून अखंड सौभाग्य प्राप्त होण्यासाठी स्त्रिया ज्येष्ठा गौरी हे व्रत करतात. गौरी किंवा महालक्ष्मीचे पूजन ज्येष्ठ नक्षत्रावर केले जाते, म्हणून यांना ज्येष्ठागौरी असेही संबोधले जाते.



गौरी आवाहन

पहिला दिवस गौरी आवाहनाचा असतो. आपापल्या पद्धत आणि परंपरेप्रमाणे घरातील प्रवेशद्वारापासून ते गौरी स्थापन करण्याच्या जागेपर्यंत रांगोळीने लक्ष्मीच्या पावलांचे ठसे काढावेत. हातात गौरी घेऊन आलेल्या बाईचे पाय दुधाने व पाण्याने धुवावे आणि त्यावर कुंकवाचे स्वस्तिक काढावे. आता येताना लक्ष्मीच्या पायांचे ठसे उमटवत उमटवत गौरींचे मुखवटे आणावेत. गौरी आगमन करत असताना ताट चमच्याने किंवा घंटेने वाजत गाजत गौरीचे स्वागत करावे. गौरीची स्थापना करण्यापूर्वी त्यांना घरातील समृद्धी, दूध-दुभत्याची जागा अशा गोष्टी दाखवाव्यात. आशीर्वाद मिळून ऐश्वर्य नांदो, अशी प्रार्थना करावी. अशा या प्रथेला गौरी आवाहन करणे, असे संबोधतात.

गौरी पूजन

दुपारी १२ वाजेपर्यंत गौरीला नैवेद्य दाखवावा. या दिवशी काही सगेसोयरीक जेवणाला सांगितले जातात. गौरी पूजन आणि आरती करतात तसेच जेवायला पुरणपोळी, ज्वारीच्या पिठाची आंबील, अंबाडीची भाजी, सोळा भाज्यांची एकत्र भाजी, दिवेफळ वगैरे पदार्थांचा नैवेद्यात समावेश असतो. नैवेद्यात शेंगदाणा आणि डाळीची चटणी, पंचामृत, पडवळ घालून केलेली ताकाची कढी, कटाची आमटी, वेगवेगळ्या प्रकारची भजी, पापड, लोणचे इत्यादी करतात.

गौरी विसर्जन

तिसरा दिवस म्हणजे गौरी विसर्जनाचा असतो. यादिवशी सकाळी पोवत्याच्या/सुताच्या गाठी पाडतात. त्या सुतात हळदीकुंकू, सुकामेवा, बेलफळ, फुले, झेंडूची पाने, काशीफळाचे फूल, रेशमी धागा असे एक एक जिन्नस घालून गाठी पाडतात. यांमध्ये हळदीकुंकू, रेशमी सूत, झेंडूची पाने, काशीफळाचे फूल हे महत्त्वाच्या वस्तू असतात. नंतर गौरींची/महालक्ष्मींची पूजा आणि आरती करतात. गोड शेवयाची खीर, उडीद डाळीचा भाजलेला पापड याचा नैवेद्य दाखवतात. या तिसऱ्या दिवशी गौरींच्या/महालक्ष्मींच्या चेहऱ्यावर एक प्रकारची उदासीनता दिसून येते. गौरींची पूजा, आरती करून पुढील वर्षी येण्याचे आमंत्रण देऊन त्यांचा निरोप घेतला जातो, आणि त्यांचे विसर्जन केले जाते. (धातूच्या किंवा कायम स्वरूपाच्या मूर्ती असतील तर त्यांचे विसर्जन करत नाहीत.) गौरींचे पाण्यात विसर्जन केल्यावर परत येताना थोडी वाळू घरी आणून ती सर्व घरभर व परसातल्या झाडांवर टाकतात. त्यायोगे घरात समृद्धी नांदते व झाडाझुडुपांचे कीटकांपासून संरक्षण होते अशी समजूत आहे. सकाळी ९ ते दुपारी २ वाजून ५६ मिनिटापर्यंत ज्येष्ठा गौरीचे विसर्जन करावे.



गौरी आवाहन

गौरींचे आगमन हे नक्षत्रानुसार होते. अनुराधा नक्षत्रामध्ये गौरींचे आगमन होते आणि मूळ नक्षत्रात त्यांचे विसर्जन केले जाते. पहिल्या दिवशी तुळशीपासून पावला-पावलांनी डोक्यावरून गौरींना घरात आणले जाते. यावेळी "गौरी आली, सोन्याच्या पावली...गौरी आली, चांदीच्या पावली... गौरी आली, गाई वासराच्या पावली...गौरी आली, पुत्र-पौत्रांच्या पावली..." असे म्हणत गौरींचे माहेरवाशीणीसारखे स्वागत केले जाते. त्यांना नवीन साड्या आणि दागदागिने घालून सजवले जाते.

गौरी पूजन

दुसऱ्या दिवशी, जेष्ठा नक्षत्रावर गौरींचे पूजन केले जाते आणि गोडधोडाचे जेवण केले जाते. यामध्ये १६ भाज्या, ५ कोशिंबिरी, पुरणाचा स्वयंपाक असे पंचपक्वान्न केले जातात. या दिवशी सवाष्ण आणि ब्राह्मणांना जेवायला बोलावले जाते. तसेच गौरींना लाडू, चिवडा, करंज्या असे फराळाचे पदार्थ, मिठाई, फळे यांचाही नैवेद्य दाखविला जातो. तसेच गौरीला विविध प्रकारची फुले आणि पत्री वाहिली जातात. सायंकाळी विवाहित स्त्रियांना हळदी-कुंकवासाठी बोलावले जाते. तसेच कुटुंबातील सदस्य, नातेवाईकाना आणि मित्र-मैत्रिणींना गौरीच्या दर्शनासाठी घरी बोलावतात.

ओवसा

अनेक ठिकाणी गौरी पूजनाच्या दिवशी ओवसा भरण्याची पद्धत असते. ओवसा म्हणजे गौरीला ओवाळणे किंवा ओवसणे , ज्याला ववसा असेही म्हटले जाते. या परंपरेद्वारे घरातील सुनेला मानसन्मान दिला जातो. त्यांना त्यांच्या आवडीच्या भेटवस्तू अथवा पैसेही दिले.

गौरी विसर्जन

तिसऱ्या दिवशी मूळ नक्षत्रावर गौरींचे विसर्जन केले जाते. काही जणांकडे गौरीसह गणरायाचे विसर्जन केले जाते, तर काही जणांकडे विसर्जन झाल्यानंतर १० दिवसांनीच गणपतीचे विसर्जन होते.

ज्येष्ठ गौरी आवाहनाचे महत्त्व

या दिवशी माता गौरी म्हणजे माता पार्वती आणि गणेशाची पूजा केली जाते. गणेश चतुर्थीच्या दोन दिवसांनी माता पार्वती कैलास पर्वतावरून धरतीवर अवतरित झाली होती, असे मानले जाते. गणरायाप्रमाणेच गौरींचेदेखील उत्साहत स्वागत होते. यावेळी फुलांनी आणि कलाकुसरीच्या वस्तूंनी सजावट केली जाते. बाजारात सुंदर आणि सुबक असे गौरीचे मुखवटे मिळतात. यामध्ये शाडू, पितळे, कापडी, फायबरचे असे काही प्रकार पाहायला मळातात. काही जण केवळ मुखवट्यांची पूजा करतात, तर काही जणांकडे उभ्या गौरी असतात. कोकणात काही ठिकाणी खुर्चीवर बसलेली गौरी पाहायला मिळते. तसेच समुद्र किंवा नदीतील खडा आणून पूजण्याची रितही असते. काही ठिकाणी तांब्यावर चेहरा रेखाटून गौरी पूजन केले जाते. प्रत्येक कुटुंबात आपआपल्या पद्धतीनुसार गौरी बसविल्या जातात. मनोभावे गौरींची स्थापना करून त्यांचे पूजन केले जाते. महाराष्ट्रात या सणाला महालक्ष्मी पूजन असेही म्हटले जाते.

